**मा. मुख्यमंत्री सचिवालय/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/**
**मा. राज्यमंत्री कार्यालयांच्या आस्थापनेवरील सावधि पदांच्या**
**संख्येत वाढ करणेबाबत व मार्गदर्शक सूचनांबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - एमआयएन-१२२४/ प्र.क्र.१५०/ मंआस्था-१**
मंत्रालय मुख्य इमारत, २ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई — ४०० ०३२.
दिनांक - १९ ऑक्टोबर, २०२६.

**संदर्भ** — शासन निर्णय क्रमांक - एमआयएन-१२२४/ प्र.क्र.१५०/ कार्या.२१ (मंआस्था-१), दिनांक १४/०१/२०२५ व दिनांक ३१/१२/२०२५.

**प्रस्तावना** :-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक १४/०१/२०२५ व दिनांक ३१/१२/२०२५ अन्वये मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या कार्यालयांसाठी सावधि पदे निश्चित करण्यात आली होती.

२. या सावधी पदांव्यतिरिक्त अनेक अधिकारी/ कर्मचारी मंत्री आस्थापनांवर विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता उसनवार/ मौखिक तत्वावर कार्यरत असल्याची बाब निदर्शनास आली होती. सदर नियुक्त्या मूळ मंत्रालयीन विभाग/ अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन/ सेवा), मुख्य सचिव व मा. मुख्यमंत्री महोदय यांची मान्यता न घेता करण्यात आल्या होत्या. मंत्रालयीन कामकाज हे पूर्णत: प्रशासकीय कामकाज असून ते गतिमान, कायदेशीरदृष्टया अचूक, पारदर्शक पध्दतीने आणि प्रस्थापित नियमांच्या चौकटीत चालणे आवश्यक आहे. सबब, उसनवार तत्वावरील सर्व नियुक्त्या तात्काळ रद्द करुन संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना दिनांक १०/०९/२०२६ पूर्वी त्यांच्या मूळ विभागात/ कार्यालयात परत पाठविण्याची कार्यवाही सर्व संबंधित मंत्री कार्यालय/ मंत्री आस्थापना यांनी करण्याबाबत मा. मुख्य सचिव यांनी दिनांक २५/०८/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना दिल्या होत्या.

३. या पार्श्वभूमीवर मंत्री आस्थापनांवर अधिकारी/ कर्मचा-यांच्या कमतरतेमुळे काही मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयांमार्फत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/०१/२०२५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या सावधि पदांच्या संख्येत वाढ करण्याच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. तसेच दिनांक २५/०८/२०२६ रोजीच्या परिपत्रकामध्ये मा. मंत्री कार्यालयांमध्ये मंजूर पदांपेक्षा जास्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची निकड असल्यास अथवा पदे रुपांतरित करणे, पद उन्नत करणे, वेतनश्रेणी वाढविणे या संदर्भात संबंधित मा. मंत्री कार्यालयाने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेकरिता पदांची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव सादर करावा आणि ती पदे विहीत पध्दतीनेच भरण्यात यावीत, अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

४. उपरोक्त सर्व बाबी व मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांच्या कार्यालयांकडून प्राप्त मागण्या पहाता, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/०१/२०२५ व दिनांक ३१/१२/२०२५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या सावधि पदांच्या संख्येत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** -

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/०१/२०२५ व दिनांक ३१/१२/२०२५ अन्वये मा. मुख्यमंत्री सचिवालयासाठी एकूण १६४ तर मा. उप मुख्यमंत्री कार्यालयासाठी प्रत्येकी ७२ तसेच प्रत्येक मा. मंत्री कार्यालयासाठी १६ व प्रत्येक मा. राज्यमंत्री कार्यालयासाठी १४ सावधि पदे निश्चित करण्यात आली आहेत. **सदर सावधि पदांमध्ये वाढ करून अनुक्रमे मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सचिवालयासाठी ४१ अतिरिक्त सावधि पदे, मा. उप मुख्यमंत्री कार्यालयासाठी प्रत्येकी १८ अतिरिक्त सावधि पदे तसेच प्रत्येक मा. मंत्री कार्यालयासाठी ०४ अतिरिक्त सावधि पदे व प्रत्येक मा. राज्यमंत्री कार्यालयासाठी ०४ अतिरिक्त सावधि पदे शासन निर्णयाच्या दिनांकापासून विद्यमान मंत्रिमंडळाच्या पदावधीपर्यंत निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.** त्यानुसार मा. मुख्यमंत्री सचिवालयासाठी एकूण २०५ तर मा. उप मुख्यमंत्री कार्यालयासाठी प्रत्येकी ९० तसेच प्रत्येक मा. मंत्री कार्यालयासाठी २० व प्रत्येक मा. राज्यमंत्री कार्यालयासाठी १८ सावधि पदे उपलब्ध राहतील.

२. मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयांकरीता सुधारीत सावधि पदांचा तपशील व सदर पदांवर नियुक्ती/ प्रतिनियुक्तीसाठी कोणत्या संवर्गातील शासकीय/ निमशासकीय कार्यालये/ स्वायत्त संस्था/ महामंडळे यातील अधिकारी/ कर्मचारी वर्ग पात्र असू शकतील, याबाबतचा मा. मुख्यमंत्री कार्यालय, मा. उप मुख्यमंत्री व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयनिहाय तपशील अनुक्रमे **परिशिष्ट "अ", "ब" व "क"** मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. तसेच बाहेरील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यपद्धती **परिशिष्ट "ड"** मध्ये दर्शविण्यात आली आहे. सावधि पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीच्या अटी व शर्ती तसेच अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींच्या मार्गदर्शक सूचना **परिशिष्ट "इ"** मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

३. मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री आस्थापनेवर नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना (बाहेरील उमेदवार वगळून) मा. मंत्री आस्थापनेवर असेपर्यंत त्यांच्या वेतनश्रेणीतील अनुज्ञेय वेतन + इतर सर्व अनुज्ञेय भत्ते (विशेष कार्यभत्ता वाहन चालक व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी) देय होतील.

४. मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री आस्थापनेवरील सर्व वाहन चालकांना व रजा राखीव वाहन चालकांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.- संकीर्ण-२०११/ प्र.क्र.३२७/ २१, दिनांक २५/०६/२०१२ अन्वये दरमहा रुपये २,०००/- विशेष कार्यभत्ता देय राहील. तसेच सर्व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.- संकीर्ण २०१२/ २११२/ प्र.क्र.२९/ १३/ २१, दिनांक २७/०५/२०१३ अन्वये दरमहा रु.३००/- विशेष कार्यभत्ता देय राहील.

५. सदर शासन निर्णयांन्वये मंजूर मनुष्यबळाव्यतिरिक्त मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यलयांच्या आस्थापनेवर कोणतेही अतिरिक्त मनुष्यबळ उसनवार / मौखिक तत्वावर घेता येणार नाही. सदर सावधि मंजूर पदांपैकी गट –ड ची पदे रुपांतरित करता येणार नाहीत. गट-ड ची पदे वगळता अन्य पदे परस्परांमध्ये रुपांतरित करताना त्याकरिता सामान्य प्रशासन विभाग/ मंआस्था-१ यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

६. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक १४/०१/२०२५ व दिनांक ३१/१२/२०२५ अन्वये या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी करण्यात आलेल्या व कार्यरत तात्पुरत्या/ अंतिम नियुक्त्या पुढे तशाच सुरू राहतील.

७. मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी वृंदावरील वेतन, प्रवास खर्च व कार्यालयीन खर्च, लेखाशिर्ष “मागणी क्र. ए-४- २०५२, सचिवालय सर्वसाधारण सेवा (००) (०३), मंत्र्यांचा स्वीय कर्मचारी वर्ग (२०५२००३४),” याखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे वेतन, प्रवासखर्च, कार्यालयीन खर्च, लेखाशिर्ष “मागणी क्रमांक ए-१ -२०१३ - मंत्रिपरिषद,” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सदरहू खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३९५/ २०२६/ सेवा-९, दिनांक १५/१०/२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र. ६०९/ २०२६/ व्यय -४, दिनांक १६/१०/२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६१०१९१८३०३७९८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

ANUSHKA
ANIRUDH DALVI

Digitally signed by ANUSHKA ANIRUDH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9779FDE0B25A0CD8F0767B06E5A1B382FA2251A5F41B535CA37FCD9E50B483C8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=73F1FB9D6CBC3DAFBAD56FB8AD850EDE51730924E3CF0C7CD07F0DACC65316C5, cn=ANUSHKA ANIRUDH DALVI
Date: 2026.10.19 18:31:33 +05'30'

**( अनुष्का दळवी )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

४. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. सह सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

६. सह/ उप सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

७. सह/ उप सचिव, उप मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

८. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२, मुंबई/ नागपूर.

९. खाजगी सचिव, सर्व मंत्री/ राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.

१०. सह/ उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन भाप्रसे, प्रशासन, अर्थसंकल्प,

११. सह/ उप सचिव, इलेक्टॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता विभाग मंत्रालय, मुंबई.

१२. सह/ उप सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

१४. सामान्य प्रशासन विभाग (कार्या. मंआस्था-२, मंआस्था-३), मंत्रालय, मुंबई.

१५. वित्त विभाग, (कार्यासन व्यय-४/ सेवा-९, आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई.

१६. निवड नस्ती कार्यासन (मंआस्था-१).

**परिशिष्ट - "अ"**

शासन निर्णय, क्रमांक - एमआयएन-१२२४/प्र.क्र.१५०/मंआस्था-१, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२६ अन्वये मा. मुख्यमंत्री सचिवालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेली सावधि पदे व सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी कोणत्या संवर्गातील शासकीय/ निमशासकीय अधिकारी/ कर्मचारी पात्र असतील याचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र.

| अ. क्र. | पदनाम | मंजूर पदे | वेतनश्रेणी | पात्र अधिकारी/ कर्मचारी यांचा तपशील. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | ३ | अ) Level in Pay Matrix १४ : १४४२०० -२१८२००<br>ब) Level in Pay Matrix १५ : १८२२०० - २२४१००<br>क) Level in Pay Matrix १७ : २२५००० | भारतीय प्रशासन सेवेतील ज्येष्ठ अधिकारी |
| २ | मा. मुख्यमंत्री यांचे सल्लागार | ५ | अ) Level in Pay Matrix १७ : २२५०००<br>ब) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>क) एस- २५ : ७८८००-२०९२००<br>ड) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>इ) एस-२९ : १३११००-२१६६०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने बाहेरील उमेदवार |
| ३ | मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव | ३ | अ) एस-२० : ५६१००-१७७५००<br>ब) एस-२३: ६७७००-२०८७००<br>क) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ड) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>आ) इ) एस-२९ : १३११००-२१६६०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय सेवेतील अधिकारी |
| ४ | मा. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी | १२ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-२० : ५६१००-१७७५००<br>क) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>ड) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>इ) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>ई) एस-२९ : १३११००-२१६६०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी/ बाहेरील उमेदवार |
| ५ | सह सचिव/ उप सचिव | १० | अ) Level in Pay Matrix १३ : १२३१००-२१५९००<br>ब) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>क) एस-२७ : १२३१००-२१५९०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी अथवा मंत्रालयातील सह सचिव/ उप सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **६** | अवर सचिव | ७ | अ) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>ब) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>{उपरोक्त (ब) साठी निवडश्रेणी वेतनस्तर मिळाल्यावर} | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अवर सचिव |
| **७** | प्रशासकीय अधिकारी | ७ | अ) Level in Pay Matrix १० : ५७७००-१८२४००<br>ब) एस-१७ : ४७६००-१५११००<br>क) एस-२० : ५६१००-१७७५००<br>ड) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>इ) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ई) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>उ) एस-२९ : १३११००-२१६६०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी/ बाहेरील उमेदवार |
| **८** | कार्यकारी अधिकारी | ५ | अ) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ब) एस-१७ : ४७६००-१५११००<br>क) एस-२० : ५६१००-१७७५००<br>ड) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>इ) एस-२५ : ७८८००-२०९२०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी |
| **९** | मा. मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक | ६ | अ) एस-१३ : ३५४००-११२४००<br>ब) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>ड) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>इ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ई) एस-२० : ५६१००-१७७५००<br>उ) एस-२३ : ६७७००-२०८७०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने शासकीय/ निमशासकीय अधिकारी, महामंडळे/ स्वायत्त संस्था मधील अधिकारी अगर समतुल्य वेतनश्रेणीतील अधिकारी/ कर्मचारी/ बाहेरील उमेदवार |
| **१०** | संचालक/ सह संचालक/ उप संचालक/ सहायक संचालक (निधी व लेखा) | १ | अ) एस-२० : ५६१००-१७७५००<br>ब) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>क) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ड) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>इ) एस-२९ : १३११००-२१६६०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट-अ चे अधिकारी |
| **११** | संशोधन अधिकारी | ५ | अ) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>ब) एस-२४ : ७११००-२११९००<br>क) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ड) एस-२७ : १२३१००-२१५९०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने बाहेरील उमेदवार |
| **१२** | वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी | २ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-२० : ५६१००-१७७५००<br>क) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>ड) एस-२५ : ७८८००-२०९२०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी |
| **१३** | कार्यक्रम अधिकारी | ३ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-२० : ५६१००-१७७५००<br>क) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>ड) एस-२५ : ७८८००-२०९२०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१४** | जनसंपर्क अधिकारी | ४ | अ) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>ब) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>क) एस-१८ : ४९१००-१५५८००<br>ड) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>इ) एस-२५ : ७८८००-२०९२०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी |
| **१५** | कक्ष अधिकारी | ११ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-२० : ५६१००-१७७५००<br>क) एस-२३ : ६७७००-२०८७०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय सेवेतील कक्ष अधिकारी |
| **१६** | माहिती अधिकारी | २ | अ) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ब) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>क) एस-१८ : ४९१००-१५५८०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी |
| **१७** | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव/ सह सचिव/ उप सचिव यांचे स्वीय सहायक, लघुलेखक | १२ | अ) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ब) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>क) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ड) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>इ) एस-२४: ७११००- २११९०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील, लघुलेखक (वरिष्ठ स्वीय सहायक/ निवडश्रेणी/ उच्च श्रेणी/ निम्नश्रेणी) |
| **१८** | सहायक कक्ष अधिकारी | १५ | अ) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ब) एस-१७ : ४७६००-१५११००<br>क) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>{उपरोक्त (ब) व (क) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील सहायक कक्ष अधिकारी |
| **१९** | सहायक अधिकारी | ८ | अ) एस-१३: ३५४००-११२४००<br>ब) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>ड) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>इ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ई) एस-२३ : ६७७००-२०८७०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील सहायक कक्ष अधिकारी अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील समतुल्य वेतनश्रेणीतील सहायक अधिकारी/ कर्मचारी |
| **२०** | लेखा अधिकारी | २ | अ) एस-१६ : ४४९००-१४२४०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेमधील गट-ब चे अधिकारी |
| **२१** | सहायक लेखा अधिकारी | ३ | अ) एस-१५ : ४१८००-१३२३०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेमधील गट-ब चे अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२२** | कनिष्ठ लेखापाल/ कनिष्ठ लेखापरीक्षक/ वरिष्ठ लेखापरीक्षक | २ | अ) एस-१० : २९२००-९२३००<br>ब) एस-१३ : ३५४००-११२४०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेमधील अधिकारी/ कर्मचारी |
| **२३** | देयक लेखापाल | १ | अ) एस-६ : १९९००-६३२०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील लिपिक-टंकलेखक |
| **२४** | लिपिक-टंकलेखक | ३० | अ) एस-६ : १९९००-६३२००<br>ब) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ड) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>{उपरोक्त (ब) व (क) व (ड) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील लिपिक-टंकलेखक |
| **२५** | लघुटंकलेखक | १ | अ) एस-८ : २५५००-८११०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील लघुटंकलेखक |
| **२६** | मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाकरीता अधिकारी/ कर्मचारी | २० | अ) एस-१३: ३५४००-११२४००<br>ब) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>ड) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>इ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ई) एस-२० : ५६१००-१७७५००<br>उ) एस-२३: ६७७००-२०८७००<br>ऊ) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ए) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>ऐ) एस-२९ : १३११००-२१६६०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी/ कर्मचारी |
| **२७** | वाहन चालक | २ | अ) एस-६ : १९९००-६३२०० | मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील वाहनचालक अथवा बाहेरील उमेदवार |
| **२८** | जमादार | २ | अ) एस-६ : १९९००-६३२००<br>ब) एस-७: २१७००-६९१००<br>{उपरोक्त (ब) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मंत्रालयातील चोपदार गट-ड संवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२९** | चोपदार | १ | अ) एस-६ : १९९००-६३२०० <br> ब) एस-७: २१७००-६९१०० <br> {उपरोक्त (ब) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मंत्रालयातील गट-ड संवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीने |
| **३०** | शिपाई/ नाईक/ संदेशवाहक | २० | अ) एस-१ : १५०००-४७६०० <br> ब) एस-३ : १६६००-५२४०० <br> क) एस-६ : १९९००-६३२०० <br> {(ब) व (क) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मंत्रालयातील तसेच शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील गट-ड संवर्गाचे कर्मचारी/ बाहेरील उमेदवार |
| | **एकूण पदे** | **२०५** | | |

ANUSHKA
ANIRUDH DALVI

Digitally signed by ANUSHKA ANIRUDH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9779FDE0B25A0CD8F0767B06E5A1B382FA2251A5F41B535CA37FCD9E50B483C8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=73F1FB9D6CBC3DAFBAD56FB8AD850EDE51730924E3CF0C7CD07F0DACC65316C5, cn=ANUSHKA ANIRUDH DALVI
Date: 2026.10.19 18:31:55 +05'30'

**( अनुष्का दळवी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट - "ब"**

शासन निर्णय, क्रमांक - एमआयएन-१२२४/ प्र.क्र.१५०/ मंआस्था-१, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२६ अन्वये मा. उप मुख्यमंत्री कार्यालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेली सावधि पदे व सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी कोणत्या संवर्गातील शासकीय/ निमशासकीय अधिकारी/ कर्मचारी पात्र असतील याचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र.

| अ. क्र. | पदनाम | मंजूर पदे | वेतनश्रेणी | पात्र अधिकारी/ कर्मचारी यांचा तपशील. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मा. उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | १ | अ) Level in Pay Matrix १४ : १४४२०० -२१८२००<br>ब) Level in Pay Matrix १५ : १८२२०० - २२४१००<br>क) Level in Pay Matrix १७ : २२५००० | भारतीय प्रशासन सेवेतील ज्येष्ठ अधिकारी |
| २ | मा. उप मुख्यमंत्री यांचे सह सचिव/ उप सचिव | ४ | **(१)**<br>अ) Level in Pay Matrix ११ : ६७७००-२०८७००<br>ब) Level in Pay Matrix १२ : ७८८००-२०९२००<br>क) Level in Pay Matrix १३ : १२३१००-२१५९००<br>**(२)**<br>अ) एस-२३: ६७७००-२०८७००<br>ब) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>क) एस-२७ : १२३१००-२१५९०० | १) भारतीय प्रशासन सेवेतील ज्येष्ठ अधिकारी<br>२) मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील सह सचिव/ उप सचिव अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील समकक्ष अधिकारी |
| ३ | खाजगी सचिव | ३ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-१८ : ४९१००-१५५८००<br>क) एस-१९ :५५१००-१७५१००<br>ड) एस-२० : ५६१००-१७७५००<br>इ) एस-२३: ६७७००-२०८७००<br>ई) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>उ) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>ऊ) एस-२९ : १३११००-२१६६०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी |
| ४ | विशेष कार्य अधिकारी | १२ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-१८ : ४९१००-१५५८००<br>क) एस-१९ :५५१००-१७५१००<br>ड) एस-२० : ५६१००-१७७५००<br>इ) एस-२३: ६७७००-२०८७००<br>ई) एस-२५ : ७८८००-२०९२०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी/ बाहेरील उमेदवार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | उ) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>ऊ) एस-२९ : १३११००-२१६६०० | |
| **५** | अवर सचिव | ३ | अ) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>ब) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>{उपरोक्त (ब) साठी निवडश्रेणी वेतनस्तर मिळाल्यावर} | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय सेवेतील अवर सचिव |
| **६** | कक्ष अधिकारी | ४ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-२० : ५६१००-१७७५००<br>क) एस-२३: ६७७००-२०८७०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय सेवेतील कक्ष अधिकारी |
| **७** | जनसंपर्क अधिकारी | ३ | अ) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>क) एस-१८ : ४९१००-१५५८००<br>ड) एस-२३: ६७७००-२०८७००<br>इ) एस-२५ : ७८८००-२०९२०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालया-तील अधिकारी |
| **८** | कार्यक्रम अधिकारी | १ | अ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ब) एस-२० : ५६१००-१७७५००<br>क) एस-२३: ६७७००-२०८७००<br>ड) एस-२५ : ७८८००-२०९२०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी |
| **९** | सहायक कक्ष अधिकारी | ८ | अ) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ब) एस-१७ : ४७६००-१५११००<br>क) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>{उपरोक्त (ब) व (क) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील सहायक कक्ष अधिकारी |
| **१०** | सहायक अधिकारी | १ | अ) एस-१३: ३५४००-११२४००<br>ब) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>ड) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>इ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ई) एस-२३ : ६७७००-२०८७०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील सहायक कक्ष अधिकारी अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील सहायक अधिकारी |
| **११** | स्वीय सहायक | ५ | अ) एस-८: २५५००-८११००<br>ब) एस-१३ : ३५४००-११२४००<br>क) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ड) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>इ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ई) एस-१८ : ४९१००-१५५८००<br>उ) एस-२० : ५६१००-१७७५०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने शासकीय/ निमशासकीय अधिकारी, महामंडळे/ स्वायत्त संस्थेमधील अधिकारी/ समतुल्य वेतनश्रेणीतील अधिकारी/ कर्मचारी/ बाहेरील उमेदवार |
| **१२** | निवासी स्वीय सहायक | ३ | अ) एस-८: २५५००-८११००<br>ब) एस-१३ : ३५४००-११२४००<br>क) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ड) एस-१५ : ४१८००-१३२३०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने शासकीय/ निमशासकीय अधिकारी, महामंडळे/ स्वायत्त संस्थेमधील |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | इ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ई) एस-१८ : ४९१००-१५५८००<br>उ) एस-२० : ५६१००-१७७५०० | अधिकारी/ अगर समतुल्य वेतनश्रेणीतील कर्मचारी/ बाहेरील उमेदवार |
| **१३** | सचिव/ सह सचिव/ उप सचिव यांचे स्वीय सहायक, लघुलेखक | ५ | अ एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ब) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>क) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ड) एस-२३: ६७७००-२०८७००<br>इ) एस-२१ :७११००-२११९०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील, लघुलेखक वरिष्ठ स्वीय सहायक/ निवडश्रेणी/ उच्च श्रेणी/ निम्नश्रेणी) |
| **१४** | लिपिक-टंकलेखक | १५ | अ) एस-६ : १९९००-६३२००<br>ब) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ड) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>{उपरोक्त (ब) (क) व (ड) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निम शासकीय सेवेतील लिपिक-टंकलेखक |
| **१५** | लघुटंकलेखक | १ | अ) एस-८: २५५००-८११०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निम शासकीय सेवेतील लघुटंकलेखक |
| **१६** | सहायक लेखा अधिकारी | १ | अ) एस-१५ : ४१८००-१३२३०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेमधील गट-ब चे अधिकारी |
| **१७** | देयक लेखापाल | १ | अ) एस-६ : १९९००-६३२०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निम शासकीय सेवेतील लिपिक-टंकलेखक |
| **१८** | वाहन चालक | २ | अ) एस-६ : १९९००-६३२०० | मा. उप मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने मंत्रालयातील अथवा राज्य शासकीय/ निम शासकीय सेवेतील वाहनचालक/ बाहेरील उमेदवार |
| **१९** | जमादार | १ | अ) एस-६ : १९९००-६३२००<br>ब) एस-७ : २१७००-६९१००<br>{उपरोक्त (ब) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मंत्रालयातील चोपदार गट-ड संवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२०** | चोपदार | १ | अ) एस-६ : १९९००-६३२०० <br> ब) एस-७ : २१७००-६९१०० <br> {उपरोक्त (ब) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मंत्रालयातील गट-ड संवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीने |
| **२१** | नाईक/ शिपाई/ संदेश वाहक | १५ | अ) एस-१ : १५०००-४७६०० <br> ब) एस-३ : १६६००-५२४०० <br> क) एस-६ : १९९००-६३२०० <br> {उपरोक्त (ब) व (क) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मंत्रालयातील तसेच शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील गट-ड संवर्गाचे कर्मचारी/ बाहेरील उमेदवार |
| | **एकूण पदे** | **९०** | | |

ANUSHKA ANIRUDH DALVI

Digitally signed by ANUSHKA ANIRUDH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9779FDE0B25A0CD8F0767B06E5A1B382FA2251A5F41B535CA37FCD9E50B483C8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=73F1FB9D6CBC3DAFBAD56FB8AD850EDE51730924E3CF0C7CD07F0DACC65316C5, cn=ANUSHKA ANIRUDH DALVI
Date: 2026.10.19 18:32:13 +05'30'

**( अनुष्का दळवी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट - "क"

शासन निर्णय, क्रमांक - एमआयएन-१२२४/ प्र.क्र.१५०/ मंआस्था-१, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२६ अन्वये मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेली सावधि पदे व सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी कोणत्या सवंर्गातील शासकीय/ निमाशाकीय अधिकारी/ कर्मचारी पात्र असतील याचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| अ. क्र. | पदनाम | मंजूर पदे | | वेतनश्रेणी | पात्र अधिकारी/ कर्मचारी यांचा तपशील. |
|---|---|---|---|---|---|
| | | मंत्री कार्यालय | राज्यमंत्री कार्यालय | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | खाजगी सचिव | १ | १ | अ) एस-२० : ५६१००-१७७५००<br>ब) एस-२३: ६७७००-२०८७००<br>क) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ड) एस-२७ : १२३१००-२१५९०० | मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या शिफारशीने सह सचिव/ उप सचिव / अवर सचिव/ उप जिल्हाधिकारी किंवा समतुल्य वर्गातील शासकीय/ निमशासकीय अधिकारी/ महामंडळे, स्वायत्त संस्था यातील अधिकारी |
| २ | विशेष कार्य अधिकारी | ५ | ५ | अ) एस-१३: ३५४००-११२४००<br>ब) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>क) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>ड) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>इ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ई) एस-१८ : ४९१००-१५५८००<br>उ) एस-१९ :५५१००-१७५१००<br>ऊ) एस-२० : ५६१००-१७७५००<br>ए) एस-२३: ६७७००-२०८७००<br>ऐ) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ओ) एस-२७ : १२३१००-२१५९०० | मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या शिफारशीने शासकीय/ निमशासकीय अधिकारी, महामंडळे/ स्वायत्त संस्था मधील अधिकारी अगर समतुल्य वेतनश्रेणीतील कर्मचारी |
| ३ | स्वीय सहायक | ४ | ४ | अ) एस-८: २५५००-८११००<br>ब) एस-१३: ३५४००-११२४००<br>क) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ड) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>इ) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ई) एस-१७ : ४७६००-१५११००<br>उ) एस-१९ :५५१००-१७५१००<br>ऊ) एस-२० : ५६१००-१७७५०० | मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या शिफारशीने शासकीय/ निमशासकीय अधिकारी, महामंडळे/ स्वायत्त संस्था मधील अधिकारी अगर समतुल्य वेतनश्रेणीतील कर्मचारी |
| ४ | लघुलेखक/ लिपिक-टंकलेखक | ४ | ३ | अ) एस-६ : १९९००-६३२००<br>ब) एस-७ : २१७००-६९१००<br>क) एस-८: २५५००-८११०० | मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या शिफारशीने शासकीय/ निमशासकीय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ड) एस-१३: ३५४००-११२४००<br>इ) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ई) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>उ) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ऊ) एस-१७ : ४७६००-१५११००<br>ए) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>{उपरोक्त (ब) (क) व (ड) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | सेवेतील अथवा महामंडळे/ स्वायत्त संस्था येथील लघुलेखक (निवडश्रेणी/ उच्चश्रेणी/ निम्नश्रेणी/ लघुटंकलेखक/ लिपिक/ लिपिक-टंकलेखक/ टंकलेखक अगर समतुल्य वेतनश्रेणीतील कर्मचारी |
| **५** | समाज माध्यम तज्ञ | १ | १ | प्रति माह ठोक मानधन रुपये १,२५,०००/- | मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या शिफारशीने बाहेरील उमेदवार. |
| **६** | वाहनचालक | १ | १ | अ) एस-६ : १९९००-६३२०० | मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महादेयांच्या शिफारशीने शासकीय/ निमशासकीय सेवेतील अथवा महामंडळे/ स्वायत्त संस्था येथील वाहनचालक |
| **७** | चोपदार | १ | १ | अ) एस-६ : १९९००-६३२००<br>ब) एस-७ : २१७००-६९१००<br>{उपरोक्त (ब) साठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यावर} | मंत्रालयातील गट-ड संवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीने |
| **८** | नाईक/ शिपाई/ संदेशवाहक | ३ | २ | अ) एस-१ : १५०००-४७६००<br>ब) एस-३ : १६६००-५२४००<br>क) एस-६ : १९९००-६३२०० | मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांच्या शिफारशीने शसकीय/ निमशासकीय सेवेतील अथवा महामंडळे/ स्वायत्त संस्था येथील शिपाई/ समकक्ष चतुर्थश्रेणी कर्मचारी |
| | **एकूण पदे** | **२०** | **१८** | | |

** मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयास विशेष कार्य अधिकारी/ स्वीय सहायक/ अथवा अन्य अतिरिक्त पदांची आवश्यकता असल्यास, मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांकडे कार्यभार असलेल्या संबंधित विभागातील कामकाजाचा भार विचारात घेवून त्या विभागांच्या सुधारित/ अद्ययावत आकृतीबंधानुसार मंजूर सह सचिव/ उप सचिव पदांच्या संख्येच्या प्रमाणात अतिरिक्त विशेष कार्य अधिकारी/ स्वीय सहायक/ अन्य पदे मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने वाढवून देण्यात येतील. त्याकरिता संबंधित मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयाने सविस्तर प्रस्ताव सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मंआस्था) यांच्याकडे सादर करावा. मात्र कोणत्याही परिस्थितीत मंत्री आस्थापनेवर अतिरिक्त मनुष्यबळाची नियुक्ती शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय करता येणार नाही.

ANUSHKA ANIRUDH DALVI

Digitally signed by ANUSHKA ANIRUDH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9779FDE0B25A0CD8F0767B06E5A1B382FA2251A5F41B535CA37FCD9E50B483C8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=73F1FB9D6CBC3DAFBAD56FB8AD850EDE51730924E3CF0C7CD07F0DACC65316C5, cn=ANUSHKA ANIRUDH DALVI
Date: 2026.10.19 18:32:27 +05'30'

**( अनुष्का दळवी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट - "ड"

शासन निर्णय क्र.- एमआयएन-१२२४/ प्र.क्र.१५०/ मंआस्था-१, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२६.

## बाहेरील उमेदवारांच्या नियुक्तीची कार्यपद्धती

सध्याच्या प्रचलित नियुक्ती पद्धतीनुसार मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांकरिता मंजूर स्वीय सहायकांपैकी दोन पदे, शिपाई/ संदेशवाहक पदांपैकी एक पद व वाहनचालक बाहेरील उमेदवार म्हणून नेमण्याची मुभा देण्यात येत आहे. संशोधन अधिकारी, स्वीय सहायक तसेच समाज माध्यम तज्ञ पदावर नियुक्तीसाठी सुचविलेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता कमीत कमी पदवीधारक व बाहेरील उमेदवारांची वयोमर्यादा १९ वर्षांपेक्षा कमी व ५८ वर्षांपेक्षा जास्त असता कामा नये. तसेच बाहेरील उमेदवार (संशोधन अधिकारी , स्वीय सहायक व समाज माध्यम तज्ञ) यांच्या नियुक्तीस मा. मुख्यमंत्री महोदयांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

**२.** वाहनचालक व शिपाई पदावरील बाहेरील उमेदवार नेमताना शैक्षणिक अर्हता किमान दहावी इयत्ता उत्तीर्ण असावी व त्यांची वयोमर्यादा १९ वर्षांपेक्षा कमी व ५८ वर्षांपेक्षा जास्त असता कामा नये.

**३.** सर्व बाहेरील उमेदवारांची नियुक्ती संबंधित मंत्री महोदयांच्या/ मंत्रिमंडळाच्या कालावधीपुरतीच मर्यादित व कंत्राटी पद्धतीची असेल. त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता व कोणतेही कारण न दाखविता कधीही संपुष्टात आणण्याचा अधिकार शासनास राहील. बाहेरील उमेदवारांना शासकीय/ निमशासकीय सेवेत सामावून घेण्याचा हक्क राहणार नाही.

**४.** निमशासकीय संस्था, महामंडळे, स्वायत्त संस्था, इ. मधील मंत्री आस्थापेनवर नियुक्त झालेले उमेदवार, बाहेरील उमेदवार म्हणून समजले जाणार नाहीत. त्यांना प्रतिनियुक्तीवर समजण्यात येईल.

**५.** बाहेरील उमेदवारातून नियुक्त करण्यात येणाऱ्या संशोधन अधिकारी, स्वीय सहायक, समाज माध्यम तज्ञ, वाहनचालक, शिपाई/ संदेशवाहक यांना नियुक्तीच्या कालावधीत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १९/०९/२०१९ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे वेतन व भत्ते वार्षिक वेतनवाढीसह व विशेष कार्य भत्ते अनुज्ञेय होतील.

| अ.क्र. | पदनाम | वेतन व भत्ते |
|---|---|---|
| १. | मा. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, मा. मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक, संशोधन अधिकारी, मा. उप मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, मा. उप मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक, निवासी स्वीय सहायक | अ) एस-८: २५५००-८११००<br>ब) एस-१३ : ३५४००-११२४००<br>क) एस-१४ : ३८६००-१२२८००<br>ड) एस-१५ : ४१८००-१३२३००<br>इ) एस-१६ : ४४९००-१४२४००<br>ई) एस-१७ : ४७६००-१५११००<br>उ) एस-२० : ५६१००-१७७५००<br>ऊ) एस-२३ : ६७७००-२०८७००<br>ए) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>ऐ) एस-२७ : १२३१०० — २१५९०० |

| अ.क्र. | पदनाम | वेतन व भत्ते |
|---|---|---|
| | | ओ) एस-२९ : १३११००-२१६६००<br>मा. मुख्यमंत्री सचिवालय/ मा. उप मुख्यमंत्री कार्यालयातील संबंधित पदांनुसार यथास्थिती आवश्यकतेनुसार अनुज्ञेय वेतनश्रेणी लागू राहील. |
| **२.** | संशोधन अधिकारी | अ) एस-२३ : ६७७००-२०८७००,<br>ब) एस-२५ : ७८८००-२०९२००<br>क) एस-२७ : १२३१००-२१५९००<br>ही वेतनसंरचना + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता + स्थानिक पूरक भत्ता + वाहतूक भत्ता अनुज्ञेय दराने |
| **३.** | स्वीय सहायक | एस- १६- रु.४४९००-१४२४०० ही वेतनसंरचना + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता + स्थानिक पूरक भत्ता + वाहतूक भत्ता अनुज्ञेय दराने |
| **४.** | समाज माध्यम तज्ञ | प्रति माह ठोक मानधन रुपये १,२५,०००/- |
| **५.** | वाहन चालक | एस-६: रु.१९९००-६३२०० ही वेतनसंरचना + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता + स्थानिक पूरक भत्ता + वाहतूक भत्ता अनुज्ञेय दराने + रु.२,०००/- दरमहा विशेष कार्यभत्ता |
| **६.** | शिपाई | एस- १- रु.१५०००-४७६०० ही वेतनसंरचना + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता + स्थानिक पूरक भत्ता + वाहतूक भत्ता अनुज्ञेय दराने + रु.३००/- दरमहा विशेष कार्यभत्ता. |

ANUSHKA
ANIRUDH DALVI

Digitally signed by ANUSHKA ANIRUDH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9779FDE0B25A0CD8F0767B06E5A1B382FA2251A5F41B535CA37FCD9E50B483C8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=73F1FB9D6CBC3DAFBAD56FB8AD850EDE51730924E3CF0C7CD07F0DACC65316C5, cn=ANUSHKA ANIRUDH DALVI
Date: 2026.10.19 18:32:40 +05'30'

**( अनुष्का दळवी )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट - "इ"**

**मा. मंत्री आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत अटी व शर्ती**

**मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांच्या आस्थापनेवर अधिकारी/ कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करतांना खालील अटी व शर्ती लागू राहतील :—**

१. परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करुन त्यानंतर किमान ५ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झाल्यावरच त्यांना या मार्गाने नियुक्तीसाठी इच्छुकता देता येईल.

२. ज्यांची नियुक्ती परिविक्षाधिन म्हणून झालेली नाही अशा कर्मचाऱ्यांच्या, नियमित नियुक्तीपासून किमान ७ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झाल्यावरच त्यांना या मार्गाने नियुक्तीसाठी इच्छुकता देता येईल.

३. संबंधित अधिकारी/ कर्मचारी ज्या प्रशासकीय विभागात/ विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयात कार्यरत आहेत त्या प्रशासकीय विभागाची व ज्या प्रशासकीय विभागात/ विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयात तो प्रतिनियुक्तीवर नियुक्ती स्विकारणार आहे, अशा दोन्ही विभागांची पूर्वसंमती व ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. अशी पूर्वसंमती व ना-हरकत प्रमाणपत्र देताना संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतवारी, कर्तव्य परायणता, सचोटी व चारित्र्य याबाबतची तपासणी मूळ संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्याने करावी व मागील १० वर्षाच्या कालावधीत झालेल्या शिक्षेचा तपशील उपलब्ध करुन द्यावा.

४. या मार्गाने नियुक्तीसाठी इच्छुकता दिलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे अलीकडचे ५ वर्षाचे गोपनीय अहवाल अवलोकन करण्यात यावे. ज्या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात येणार आहे, त्या पदावर पदोन्नतीसाठी/ त्या दर्जाच्या पदावर पदोन्नतीसाठी आवश्यकता ठरविलेली गोपनीय अहवालाची किमान प्रतवारी धारण केली असल्यास त्यांचा या मार्गाने प्रतिनियुक्तीसाठी विचार करता येईल.

५. परिविक्षाधीन कालावधी सुरु असताना कोणत्याही अधिकारी/ कर्मचाऱ्यास, प्रतिनियुक्तीवर पाठविता येणार नाही.

६. मा. मुख्यमंत्री सचिवालय/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुकता दिलेला अधिकारी/ कर्मचारी ज्या संवर्गात कार्यरत आहे त्या संवर्गातील मंजूर पदसंख्येपैकी २५ टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त असल्यास, त्या अधिकारी/ कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीवर पाठविता येणार नाही.

७. विशिष्ट शैक्षणिक अर्हतेच्या पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा व सेवेचा त्या विशिष्ट क्षेत्रातच उपयोग होणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता, पोलीस/ अध्यापकीय/ शिक्षकीय/ तांत्रिक/ वैद्यकीय/ विधि यांसारख्या विशेष संवर्गातील पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती मा. मुख्यमंत्री यांचे मान्यतेशिवाय करता येणार नाही.

८. गट-ड च्या सावधि पदांवर केवळ गट-ड च्या कर्मचा-यांचीच नियुक्ती करता येईल.

**२. मा. मंत्री कार्यालयातील सावधि पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केल्यावर सदर पदांवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी हाताळण्याबाबतच्या सूचना —**

**१)** मा. मंत्री आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी मंत्री महोदयांकडून शिफारस पत्र प्राप्त झाल्यानंतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या संबंधित प्रशासकीय विभाग/ नियंत्रक कार्यालय/ मूळ कार्यालय यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र तसेच आवश्यक सेवाविषयक माहिती मागविण्यात येईल. सदर माहिती शिफारस पत्र दिल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत प्राप्त होणे आवश्यक राहील. माहिती प्राप्त झाल्यानंतर प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबतचे आदेश सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येतील.

**२)** प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेल्या पदावर रूजू झाल्याचे संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी खाजगी सचिव यांचे स्वाक्षरीने सह/ उप सचिव (मंआस्था) यांना कळवावे.

**३)** मा. मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी बढतीस पात्र असल्यास व त्यांची मंत्री कार्यालयास आवश्यकता असल्यास अशा अधिकारी/ कर्मचारी यांना प्रपत्र बढती देण्याबाबत अथवा प्रपत्र बढतीचा कालावधी वाढविण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभाग/ संवर्ग नियंत्रण विभाग/ मूळ कार्यालयास मा. मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने कळविण्यात यावे. तसे कळविले न गेल्यास प्रपत्र बढतीचा कालावधी संपल्यानंतर संबंधित अधिकारी/ कर्मचारी मंत्री आस्थापनेवर कार्यरत राहिल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

**४)** मा. मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांची प्रपत्र बढती झाल्यास प्रपत्र बढतीच्या पदावर सदर अधिकारी/ कर्मचारी रुजू झाल्याचे पत्र खाजगी सचिव यांनी सह/ उप सचिव (मंआस्था) यांना द्यावे.

**५)** मा. मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा विषयक सर्व बाबी संबंधित प्रशासकीय विभागाकडून/ नियंत्रक कार्यालयाकडून हाताळण्यात येतील. त्यानुषंगाने या

अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द तक्रारी/ शिस्तभंगविषयक कारवाई, विभागीय चौकशी इ. बाबी संबंधित विभागाकडून हाताळण्यात येतील. मा. मंत्री आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात आलेल्या एखाद्या अधिकारी/ कर्मचारी यांची विभागीय चौकशी सुरु करावयाची झाल्यास त्यांना प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून मूळ विभागात परत पाठविण्यात येईल. मा. मंत्री आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचेकरिता मूळ विभाग/ कार्यालय हेच शिस्तभंग विषयक प्राधिकरण राहील. त्यानुषंगाने या अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द तक्रारी/ शिस्तभंगविषयक कारवाई, विभागीय चौकशी, इ. बाबी संबंधित मूळ विभागाकडून हाताळण्यात येतील. तसेच जर एखाद्या अधिकारी/ कर्मचा-याचे सेवानिवृत्तीनंतर तक्रार/ विभागीय चौकशी इ. प्रकरण उद्धवल्यास त्याबाबत संबंधित मूळ विभाग/ कार्यालयाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

६) पारपत्र काढण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र संबंधित प्रशासकीय विभाग/ मूळ कार्यालयाकडून देण्यात येईल.

७) मा. मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालांची अभिरक्षा व संस्करण संबंधित प्रशासकीय विभाग/ कार्यालयाकडून करण्यात येईल. तसेच संस्करण अधिकारी/ आस्थापना अधिकारी हे अधिकारी मूळ विभागाचे/ कार्यालयाचे असतील.

८) मा. मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे दरवर्षीचे मार्च अखेरचे मत्ता व दायित्व विवरणपत्र संबधित प्रशासकीय विभाग/ नियंत्रक कार्यालयास सादर करावे.

९) मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री तसेच त्यांचे कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या शासकीय परदेश दौऱ्याबाबत संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल.

१०) मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या खालील बाबी सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन (मंआस्था) कडून हाताळण्यात येतील :-

अ) पदोन्नतीनंतरची/ आश्वासित प्रगती योजनेच्या लाभानंतरची वेतननिश्चिती,
आ) प्रतिनियुक्ती कालावधीतील रजा
इ) उत्सव अग्रीम
ई) वैद्यकिय खर्च प्रतिपूर्ती
उ) भविष्य निर्वाह निधी अग्रीम
ऊ) सावधि पदावर कार्यरत असताना सेवानिवृत्त झाल्यास सेवानिवृत्ती विषयक लाभ मंजूर करणे
ए) वेतन व भत्ते

**११)** घरबांधणी अग्रीम, मोटार कार अग्रीम, वैयक्तिक संगणक अग्रीम इ. अग्रिमे मंजूर करण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभाग/ नियंत्रक कार्यालयाकडून करण्यात येईल.

**१२)** सावधि पदावर नियुक्त करण्यात आलेल्या नगरपालिका/ महानगरपालिका/ महामंडळ इ. मधील अधिकारी/ कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधीचे अंशदान संबंधित कार्यालयांकडून देण्यात येते. शासकीय भविष्य निर्वाह निधी नियम या अधिकारी/ कर्मचारी यांना लागू नसल्याने सदर अंशदानाची रक्कम शासनाकडून अदा करण्यात येणार नाही. तसेच अधिकारी/ कर्मचारी यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर रजा वेतन/ निवृत्ती वेतन अंशदान (असल्यास) त्याची रक्कम नगरपालिका/ महानगरपालिका/ महामंडळ इ. यांनी शासनास कळविणे आवश्यक राहील. तद्नंतर ही रक्कम शासनाकडून अदा करण्यात येईल.

**१३)** मंत्री आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या प्रकरणी भविष्यात फरकाची रक्कम इ. देण्याबाबतचे आदेश संबंधित मूळ विभागाने निर्गमित करणे आवश्यक राहील.

**१४)** मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांच्या कार्यालयांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.- तक्रार २६१५/ १४५०/ प्र.क्र.२९९/ २१, दिनांक १३/१०/२०१६ अनुसार त्यांचे कार्यालयासाठी जन माहिती अधिकारी, सहायक जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी नियुक्त करणे बंधनकारक आहे. त्यानुसार अधिका-यांची त्वरित नियुक्ती करुन त्याबाबतचे आदेश कार्यासन (मंआस्था-१) कडे पाठविण्यात यावेत. अशा अधिका-यांची नियुक्ती कार्यासन (मंआस्था-१) कडून नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी/ कर्मचारी यांच्यामधूनच करावी.

**१५)** मा. मंत्री महोदयांनी एखाद्या अधिकारी/ कर्मचारी यांस मुदतपूर्व कार्यमुक्त केल्याचे पत्र सह/ उप सचिव (मंआस्था) यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर कार्यासन (मंआस्था-१) ने सदर अधिकारी/ कर्मचाऱ्याच्या सेवा त्यांच्या संबंधित प्रशासकीय विभागास/ कार्यालयास प्रत्यार्पित करण्याबाबतची कार्यवाही सात दिवसांच्या आत करावी. सेवा प्रत्यार्पित केल्यानंतर सदर अधिकारी / कर्मचारी रुजू झाल्याबाबत संबंधित विभागाने / कार्यालयाने कार्यासन (मंआस्था-१) ला तत्काळ कळवावे.

**१६)** मा. मंत्री कार्यालयातील बाहेरील उमेदवारांची नियुक्तीपूर्व चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

**१७)** बाहेरील उमेदवारांच्या सेवा समाप्त केल्यानंतर त्याबाबतची सूचना / पत्र कार्यासन (मंआस्था-१/ मंआस्था-३) ला त्वरित पाठविण्यात यावे. जेणेकरुन बाहेरील उमेदवारांना अतिप्रदान होणार नाही.

**१८)** बाहेरील उमेदवारांपैकी स्वीय सहायक या पदावरील अधिकारी/ कर्मचारी यांची नियुक्ती परिशिष्ट “अ”, “ब” व “क” मध्ये नमूद करण्यात आलेल्या स्वीय सहायकांच्या मंजूर पदांच्या मर्यादेतच असेल.

**१९)** मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयातील बाहेरील उमेदवारांना नियुक्तीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ लागू राहतील. तसेच त्यांनी त्यांचे मत्ता व दायित्वाचे मार्च अखेरचे विवरणपत्र दरवर्षी खाजगी सचिवांकडे सादर करणे बंधनकारक राहील. मंत्रिमंडळाचा पदावधी संपुष्टात आल्यानंतर खाजगी सचिवांनी सदर मत्ता व दायित्व विवरणपत्रे कार्यासन (मंआस्था-१) कडे सुपूर्द करावीत.

**२०)** सदर शासन निर्णयान्वये मा. मुख्यमंत्री सचिवालय/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयांकरीता मंजूर केलेल्या सावधी पदांवर नियुक्त अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यासन मंआस्था-२ मार्फत ओळखपत्र देण्यात येते. मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयांच्या आस्थापनेवरील सदर ओळखपत्र प्राप्त अधिकारी/कर्मचारी यांनाच मंत्रालय प्रवेश ओळखपत्र (आरएफआयडी कार्ड) वितरीत करण्यात यावे. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांना मंत्रालय प्रवेश ओळखपत्र (आरएफआयडी कार्ड) वितरीत करण्यात येवू नये.

**२१)** मंत्री आस्थापनेवरुन सेवा प्रत्यार्पित/ समाप्त झाल्यानंतर संबंधितांनी मा. मुख्यमंत्री/ मा. उप मुख्यमंत्री/ मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री कार्यालयाचे ओळखपत्र सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन (मंआस्था-२) येथे जमा करणे अनिवार्य आहे.

उपरोक्त सूचनांची काटेकोरपध्दतीने अंमलबजावणी करण्यात यावी.

ANUSHKA ANIRUDH DALVI

Digitally signed by ANUSHKA ANIRUDH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9779FDE0B25A0CD8F0767B06E5A1B382FA2251A5F41B535CA37FCD9E50B483C8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=73F1FB9D6CBC3DAFBAD56FB8AD850EDE51730924E3CF0C7CD07F0DACC65316C5, cn=ANUSHKA ANIRUDH DALVI
Date: 2026.10.19 18:33:04 +05'30'

**( अनुष्का दळवी )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**